
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मोहोळ तालुक्यातील शैक्षणिक विकास 1949 ते 2010 : एक दृष्टिक्षेप



**डॉ. सज्जन उद्धव पवार**
**सहाय्यक प्राध्यापक**
**इतिहास विभाग , शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज**

**प्रस्तावना:**

मोहळ हा सोलापूर जिल्ह्यातील तालुका मोहोळ आहे. मोहोळ तालुक्याच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनात शिक्षणामुळे महत्त्व प्राप्त झाले आहे. मोहोळ तालुक्याच्या शैक्षणिक विकासात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च व शेतीविषयक शिक्षणाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शिक्षणामुळे माणसाच्या जीवनाचा कायापालट होतो . माणूस चांगल्या प्रकारे घडला जातो. त्यास सामाजिक जीवनात महत्त्व प्राप्त होते. मोहोळ तालुक्याच्याही विकासात शैक्षणिक विकासाला महत्त्वाचे स्थान आहे. त्यादृष्टीने या शोधनिबंधात तालुक्यात झालेल्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्राथमिक शिक्षण :**

मुंबई प्राथमिक शिक्षणाचा कायदा सन 1947 साली करण्यात आला. तो महाराष्ट्रसाठी सन 1949 मध्ये लागू झाला.1 या कायद्याने प्राथमिक शिक्षणाची रूपरेषा ठरविण्यात आली. या कायद्याने शाळेत जाण्यासाठी मुलांचे वय हे सहा वर्षे ठरविण्यात आले. 2 प्राथमिक शिक्षणाची ही योजना महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात सन 1947-48 मध्ये लागू करण्यात आली. त्याचवेळी सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यामध्ये प्राथमिक शिक्षणाला फारच महत्त्व देण्यात आले. त्यातून सोलापूर जिल्हा परिषद माध्यमातून जवळ जवळ प्रत्येक गावामध्ये प्राथमिक शाळा निर्माण करण्यात आल्या आहेत. तर काही गावातून प्राथमिक खाजगी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या सन 1951 मध्ये 55 व शिक्षण घेणारे एकूण विद्यार्थी 9046 तर त्यांना शिकवण्यासाठी 198 शिक्षक होते.3 पुढील दहा वर्षाच्या काळात सन 1961 साली शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची संख्या अनुक्रमे 96, 14,344 व 326 असे वाढत गेली. यावरून असे दिसते की, दहा वर्षांमध्ये शाळांची संख्या जवळपास दुप्पट झाली आणि विद्यार्थी संख्या तितक्याच पटीने वाढत गेली. मोहोळ तालुक्यामध्ये प्राथमिक शिक्षणाला फारच महत्त्व देण्यात आले आहे. त्यातून सोलापूर जिल्हा परिषद माध्यमातून जवळ-जवळ प्रत्येक गावांमध्ये प्राथमिक शाळा निर्माण करण्यात आल्या आहेत. तर काही गावांमध्ये प्राथमिक खाजगी शाळाही सुरू करण्यात आल्या आहेत. सन 1962 मध्ये प्राथमिक शाळांची संख्या 103 वर गेली तर विद्यार्थ्यांची संख्या 15,199 वर गेली.4 सन 1962 नंतर मोहोळ तालुक्यातील प्राथमिक शाळांची संख्या वाढत गेल्याचे दिसून येते. सन 2009-10 मध्ये जिल्हा परिषदेकडून चालवलेल्या प्राथमिक शाळा 186 होत्या. त्यामध्ये इयत्ता पहिली ते इयत्ता चौथीच्या वर्गात 10,164 मुले व 9,075 मुली शिक्षण घेत होत्या. इयत्ता पाचवी ते इयत्ता

सातवीच्या वर्गामध्ये 2,871 मुले, 1,968 मुली शिक्षण घेत होत्या. 5 सद्यस्थितीमध्ये प्राथमिक शाळा संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

तालुक्यातील प्राथमिक शाळांमधून विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार आणि शालेय गणवेश दिला जातो. तसेच सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेखाली हजारो विद्यार्थ्यांना शासकीय मदत दिली जाते. प्राथमिक शाळांमधून बालनाट्य, लोकनृत्य, समूहगायन खेळांच्या विविध स्पर्धा, बाल आनंद मेळावा, प्रश्नमंजुषा असे कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो. अशा विविध योजना व उपक्रमामुळे मोहोळ तालुक्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्यास मदत झाली आहे. त्यातून मोहोळ तालुक्याच्या शैक्षणिक विकासात हातभार लागला आहे.

**माध्यमिक शाळा :**

प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा महत्त्वाचा पाया असल्याने मोहोळ तालुक्यात प्राथमिक शिक्षणाला मोठे महत्व प्राप्त झाले. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाची सोय व्हावी म्हणून माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरू करण्यात आल्या. मोहोळ तालुक्यामध्ये पहिले माध्यमिक विद्यालय मोहोळ तालुका सहकारी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेने जून 1950 मध्ये नागनाथ विद्यालय, मोहोळ या नावाने सुरू करून माध्यमिक शिक्षणाचा पाया घातला. या संस्थेचा मुख्य उद्देश गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण शिक्षण देणे हा होता.6 त्यानंतर मोहल तालुक्यांमध्ये अनेक माध्यमिक विद्यालय उत्तरोत्तर सुरू झाली. माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या सन 1951 मध्ये 01 होती. ती वाढत जाऊन सन 1961 मध्ये 06 वर गेली. सन 1951 मध्ये एकूण 62 विद्यार्थी शिक्षण घेत होते व त्यांना शिकणारे 02 शिक्षक होते. सन 1961 मध्ये 633 विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले व त्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांची संख्या 26 वर गेली. 7 यावरून असे दिसते की, दहा वर्षांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली होती. मोहोळ तालुक्यात सन 2007-08 मध्ये माध्यमिक शाळांची संख्या 59 होती. 8 या सर्व विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 45,542 होती. त्यामध्ये 11,051 मुलींचाही समावेश होता. तर त्यांना 850 माध्यमिक शिक्षक अध्यापनाचे कार्य करीत होते. 9 तालुक्यात सन 2010 पर्यंत 59 माध्यमिक विद्यालयात लांबोटी व जामगाव खुर्द येथील माध्यमिक आश्रमशाळाचाही समावेश आहे. तालुक्यात एकूण सहा आश्रमशाळा असून त्यामध्ये चार प्राथमिक आश्रम शाळा व दोन माध्यमिक आश्रम शाळा आहेत. या सहा आश्रम शाळेत सर्व प्रकारचे मिळून एकूण 56 कर्मचारी कार्यरत आहेत. या आश्रमशाळेमुळे तालुक्यातील गरजू व अनाथ मुलांच्या राहण्याची जेवणाची व शिक्षणाची सोय होण्यास मदत झाली आहे. 10 या विविध माध्यमिक विद्यालयांनी निकालाची परंपरा राखून शैक्षणिक क्षेत्रात प्रगती केल्याचे दिसून येते. त्यातून मोहोळ तालुक्याच्या शैक्षणिक विकासात वाढ होण्यास मदत झाली आहे.

**महाविद्यालयीन शिक्षण :**

शैक्षणिक क्षेत्रात उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून कै. संभाजीराव गरड बहुउद्देशीय संस्था, मोहोळ या शिक्षण संस्थेने देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय स्थापन करून उच्च शिक्षणाची सोय केली. या महाविद्यालयाच्या स्थापनेत मा. आमदार शहाजीराव शंकरराव पाटील यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. मोहोळ येथील संभाजीराव गरड महाविद्यालय जून 1990 मध्ये सुरू करण्यात आले आहे. ते तालुक्यातील पहिले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात तालुक्यातील पेनुर, पाटकुल, खंडाळी, कुरुल, कामती व इतर विविध गावातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये समाजातील सर्व जाती धर्माच्या मुलाचा समावेश होतो. सन 2009-10 मध्ये एकूण विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जातीचे 116, अनुसूचित जमातीचे 41, भटक्या जमातीचे 176, इतर मागासवर्गीय 116, बिगर मागासवर्गीय 305 असे एकूण 754 विद्यार्थी शिक्षण घेत होते. यावरून या महाविद्यालयांमध्ये विविध जाती-धर्मांचे विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. या महाविद्यालयाचे निकालाची परंपरा ही चांगली आहे. महाविद्यालयात जिमखाना विभागामार्फत विविध खेळांचे शिक्षण दिले जाते. महाविद्यालयातील ग्रंथालयाचा, संगणकाचाही विद्यार्थ्यांना चांगला फायदा होत आहे.11

तसेच मोहोळ तालुक्यातील अनगर गावी बाबुराव अण्णा पाटील यांचे उच्च शिक्षणाचे ध्येय पूर्ण करण्याच्या हेतूने त्यांचे सुपुत्र मा. आ. राजन पाटील यांनी बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय स्थापन केले आहे. या महाविद्यालयाची स्थापना जून 2001 मध्ये अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ,अनगर या संस्थेच्या अधिपत्याखाली झालेली आहे. या महाविद्यालयात कलाशाखेबरोबर विज्ञान शाखेचे शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांना तालुक्यातच विज्ञान शाखेतील शिक्षण घेण्याची संधी मिळाली.12 या पारंपारिक शिक्षणाबरोबर प्रा. आ. लक्ष्मणराव ढोबळे यांनी तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या खेळाच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने मोहोळ शहरालगत छत्रपती शिवाजी शारीरिक शिक्षण शास्त्र महाविद्यालय सुरू केले. त्यामुळे या महाविद्यालयातून अनेक खेळाडू व खेळाचे प्रशिक्षिक तयार झाले. सद्यस्थितीत तहे महाविद्यालय बंद असले तरी तालुक्यातील तत्कालीन परिस्थितीत पारंपारिक शिक्षणाबरोबर खेळाच्या उच्च शिक्षणाची सोय होऊन तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात प्रगती घडून आली.

## इतर शिक्षण संस्था :

मोहोळ तालुक्यात उच्च शिक्षणाच्या जोडीला व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्यामध्ये कृषी तंत्र विद्यालय अनगर, शासकीय आय.टी.आय. कॉलेज मोहोळ, काही अध्यापक विद्यालय, जिल्ह्यातील एकमेव असलेले जवाहर नवोदय विद्यालय पोखरापूर इत्यादी शिक्षण संस्थांचा समावेश होतो. तालुक्यातील विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्राचे ज्ञान व्हावे म्हणून अनगर येथील कृषी विद्यालयाची स्थापना करून अनेक विद्यार्थी कृषी पदविका घेऊन बाहेर पडत आहेत. तसेच अध्यापक विद्यालयाच्या मार्फत अनेक शिक्षकांनी प्रशिक्षण मिळून ते विविध शाळेतून कार्यरत आहेत. उच्च शिक्षणाच्या बरोबर तंत्र शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शहरात शासकीय आय.टी.आय कॉलेज कार्यरत आहे. या कॉलेजमधून तंत्रज्ञानाचे शिक्षण तालुक्यातील विद्यार्थ्यांना मिळत आहे. आज आय.टी.आय झालेले हजार विद्यार्थी सोलापूर शहर व जिल्ह्याबाहेरील विविध उद्योगधंदे मधून कार्यरत आहेत. त्यातून त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न मिटला आहे.

## वसतीगृहे:

मोहोळ तालुक्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था व्हावी म्हणून काही गावात दोन वसतीगृह निर्माण करण्यात आली आहेत. त्यामध्ये बुधाराम विद्यार्थी वस्तीगृह कामती बुद्रुक, यशवंतराव चव्हाण विद्यार्थी वस्तीगृह मोहोळ, अमोगसिद्ध वसतिगृह कोरवली, अहिल्याबाई कन्या वसतिगृह मोहोळ व मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह सावळेश्वर इत्यादी वस्तीगुहाचा समावेश आहे. यामधून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या वसतिगृहासाठी शासनाकडून शासकीय अनुदान मिळते. या अनुदानावर तेथील विद्यार्थ्यांच्या राहण्याचा व जेवणाचा खर्च केला जातो.13

अशाप्रकारे मोहोळ तालुक्यात प्राथमिक, माध्यमिक, उच्च व तंत्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यातून तालुक्यातील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिक्षणाची संधी प्राप्त झालेली आहे. मोहोळ तालुक्याच्या शैक्षणिक विकासात या विविध शैक्षणिक संस्थांचे मोलाचे योगदान राहिले आहे. शिक्षणाचा धागा पकडून वाड्या वस्त्यावरच्या लोकांच्या घरापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवून शिक्षणापासून दूर राहिलेल्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य तालुक्यातील या संस्थांनी केलेले आहे. तालुक्यातील या संस्थांच्या माध्यमातून अनेक जणांचे भवितव्य घडलेले आहे. त्यामुळे या विविध प्रकारच्या शिक्षणामुळे तालुक्याच्या सर्वांगीण विकास होण्यास मदत झालेली आहे.

## संदर्भ साधने:

1. Bombay Archives , Education Dept., File 7796, 1950.
2. Bombay Archives , Education Dept., File SNN, 1655/1955.

3. मुंबई पुराभिलेखागार, भारतीय जनगणना, 1961, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, सोलापूर, महाराष्ट्र शासन, मुंबई, R40016/2, पृ.197.
4. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, सोलापूर, 1961-62, पृ.53.
5. सोलापूर जिल्हा परिषद वार्षिक प्रशासन अहवाल, 2009- 10, पृ.110.
6. नागनाथ विद्यालय कार्यालयीन माहिती (1950), प्रत्यक्ष भेट, दि. 07/03/2013.
7. उपरोक्त भारतीय जनगणना, 1961, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, सोलापूर, पृ.197.
8. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सोलापूर जिल्हा, 2007-08, पृ.106.
9. कित्ता, पृ.108.
10. मुलाखत, श्री. एस. बी. निम्बर्गी, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, दि. 06/06/2013.
11. देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय मोहोळ, कार्यालय माहिती (1990-2010), दि.07/12/2013.
12. बाबुराव पाटील कला व वाणिज्य महाविद्यालय, अनगर, कार्यालय माहिती,( 2001-2010), दि.12/03/2013.
13. सोलापूर जिल्हा परिषद वार्षिक अहवाल, भाग-2, प्रकरण-1,1995-96, पृ.12.